आर.बी.आय.ला.नं.युबीडी/महाराष्ट्र/१५१३ पी/दि.२४/११/१९९७
सहकार खाते नोंदणी क्र.ए.एन.आर./बी.एन.के./(ओ)/१४२/दि.१९/०९/१९९७

श्री रुक्मिणी सहकारी बँक लि. श्रीगोंदा

"सिटी प्राईड" बिल्डींग, दौंड-जामखेड रोड, श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा जि. अ.नगर पिन ४१३ ७०१.
फोन : (०२४८७) २२०५५०, २२०७५०
Web : www.shrirukminibank.com / E-mail : hoshrigonda@shrirukminibank.com



२७ वा
वार्षिक अहवाल
२०२२-२३

श्री रुक्मिणी सहकारी बँक लि. श्रीगोंदा



सीए. श्री. वसंत बापुराव गुंड
चेअरमन



सीए. श्री. सुरेश रावसाहेब गावडे
व्हा. चेअरमन

संचालक मंडळ



श्री. भास्कर सिद्राम माने (डी.ई.ई.)



श्री. दिनकर मारुती सोनवणे (बी.कॉम)



श्री. नामदेव रोहीदास कुरुमकर



श्री. शहाजी कृष्णांत गायकवाड



श्री. अशोक गणपत कोल्हे (एम.कॉम)



ॲड. श्री. पांडुरंग विठ्ठल गुंड (एल.एल.बी.)



श्री. सुभाष मच्छिंद्र काळाणे (बी.ए.)



श्री महिपत बाळासो नलवडे (एम.बी.ए.)



श्री. महेश बाळासो नागवडे (एम.बी.ए.)



श्री. भगवान म्हसा लकडे



श्री. बाळासाहेब भास्कर जगताप (बी.कॉम)



सौ. अलका राघू शिंगाडे



श्रीमती. कौशल्या जालिंदर जगताप



श्रीमती. रोहीणी भाऊसाहेब रोडे



सौ. शकुंतला रत्नाकर महामुनी

व्यवस्थापन मंडळ

अ.क्र.	संचालकाचे नाव	शिक्षण	हुद्दा
१.	*ॲड. श्री. पांडुरंग विठ्ठल गुंड*	B.Com., G.D.C.&A,LL.B.	चेअरमन
२.	*सीए. श्री. सुरेश रावसाहेब गावडे*	B.Com., F.C.A.	सदस्य
३.	*श्री. नितीन चंद्रकांत दळवी*	B.Sc.(Horticulture), M.B.A.	सदस्य
४.	*श्री. सुनिल जगदिश बोटलवार*	D.E.E., B.Com.	सदस्य
५.	*श्री. धैर्यशील शशिकांत माने*	M.Com, D.T.L., G.D.C.&A	सदस्य

सर्व कर्मचारी वृंद

श्री रुक्मिणी सहकारी बँक लि. श्रीगोंदा

।। प्रेरणास्थान ।।



कै. विठ्ठलराव बापुराव गुंड (नाना)

चेअरमन, श्री रुक्मिणी सहकारी बँक, श्रीगोंदा

(स्वर्गवास : सोमवार दि. ०५ एप्रिल २०२१)

श्री रुक्मिणी सहकारी बँकेच्या स्थापनेपासून ते जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत बँकेचा नावलौकिक व प्रगतीचा सतत चढता आलेख ठेवणारे, प्रामाणिक, प्रेमळ, अभ्यासू, परोपकारी, कष्टाळू, वारकरी पंथाचा वारसा जपणारे आष्टपैलु व्यक्तिमत्व (नाना)

वाटले नव्हते कोणालाही असे अघटीत घडून जाईल, चालता बोलता देव तुम्हास नेईन...
माणुसकी, स्नेह याची ज्यावेळी चर्चा होईल, त्यावेळी सर्वात पहिली आठवण तुमची येईल.

श्री रुक्मिणी सहकारी बँक लि. श्रीगोंदा

* ठेवीवरील व्याजदर *

अ.नं.	मुदत	व्याजदर
१.	३० दिवस ते ९० दिवस	५.००%
२.	९१ दिवस ते १८० दिवस	६.००%
३.	१८१ दिवस ते १२ महिने	७.००%
४.	१३ महिने ते पुढील कालावधीसाठी	८.००%
५.	दामदुप्पट ठेव	१०५ महिने
६.	दामदिडपट ठेव	६१ महिने
७.	आवर्त ठेव	७.००%
८.	सेव्हिंग ठेव	३.००%

जेष्ठ नागरीकांना अर्धा (०.५०%) जादा व्याज देण्याची सुविधा

* कर्जावरील व्याजदर *

अ.नं.	कर्ज प्रकार	व्याजदर
१.	सोने तारण कर्ज	१०.००%
२.	वाहन तारण कर्ज	१२.००%
३.	घर बांधणी कर्ज	१२.००%
४.	प्लॅन्ट ॲण्ड मशिनरी कर्ज	१२.५०%
५.	व्यापार व्यवसाय कर्ज	१३.००%
६.	कॅश क्रेडिट कर्ज	१३.००%
७.	शेती सुधारणा कर्ज	१३.५०%
८.	शेती वाहन कर्ज	१२.००%
९.	विविध वस्तु खरेदी कर्ज	१३.५०%
१०.	एन.एस.सी./के.व्ही.पी. कर्ज	१३.५०%

सोने तारण कर्जावर द.सा.द.शे. १०% व्याजदर व १० ग्रॅम सोन्यावर ३७,८०० कर्ज सुविधा

।। श्री ।।

श्री रुक्मिणी सहकारी बँक लि., श्रीगोंदा

२७ वा वार्षिक अहवाल २०२२–२३

वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

सर्व सभासद बंधू भगिनींना विनंती की, आपल्या बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. १६/०९/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता **तुळशिदास मंगल कार्यालय, श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर** येथे बँकेचे चेअरमन सीए. श्री. वसंतराव बापुराव गुंड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेस पुढील विषयांवर चर्चा करण्यात येईल, तरी आपण उपस्थित रहावे ही विनंती.

-: सभेपुढील विषय :-

१) मागील दि. १८/०९/२०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२) मा. संचालक मंडळाने सादर केलेल्या सन २०२२–२३ च्या वार्षिक अहवालावर विचार विनिमय करणे व तो स्विकृत करणे, तसेच दि. ३१ मार्च २०२३ अखेरचे ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मंजुरी देणे.
३) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२२–२३ च्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
४) सन २०२२–२३ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालावर चर्चा करणे व तो स्विकृत करणे.
५) सन २०२२–२३ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालावर चर्चा करणे व तो स्विकृत करणे.
६) संचालक मंडळाने सन २०२३–२४ साठी सादर केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे तसेच सन २०२२–२३ च्या अंदाजपत्रकातील जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
७) सन २०२३–२४ साठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या परिपत्रकानुसार शिफारस केलेल्या वैधानिक लेखापरिक्षक नेमणूकीस व त्यांचे मानधनास मंजुरी देणे.
८) संचालक मंडळ, सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाचे महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम ७५(२) नुसार माहिती घेणे.
९) मा. संचालक मंडळास सन २०२३–२४ साठी बाह्य निधी / कर्ज उभारणीचे अधिकार देणे.
१०) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मंजुरी देणे.
११) मा. सभासद, संचालक व सेवकांना दिलेल्या प्रशिक्षणाचा आढावा घेणे व पुढील प्रशिक्षण देणेबाबत कार्यवाही करणे.
१२) बँकेसाठी स्वमालकीच्या जागा/इमारत खरेदी करणे, दुरुस्ती करणे तसेच अतिरिक्त जागेची विक्री करणे व खरेदी केलेल्या जागांची नोंद घेणे.
१३) बँकेच्या स्टाफींग पॅटर्न व सेवा नियमाबाबत विचार विनिमय करणे.
१४) बँकेचा लाँग टर्म परफेक्टीव्ह (डेव्हलपमेंट) प्लॅन व वार्षिक कार्यवाहीचा आढावा घेऊन त्यास मान्यता देणे.
१५) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची रजा मंजूर करणे.
१६) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर विचार विनिमय करणे.

स्थळ :- श्रीगोंदा
दि. :- ३१/०८/२०२३

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन
श्री. अशोक विठ्ठल मडके
व्यवस्थापक

सभासदांना विशेष सुचना

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच दिवशी सकाळी ११.३० वाजता सुरु होईल व विषयपत्रिकेनुसार सभेचे कामकाज होईल, त्यावेळी गणसंख्या पूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२) मा. सभासदांना वार्षिक अहवालाची प्रत मिळाली नसल्यास ती बँकेचे मुख्य कार्यालय व बँकेच्या सर्व शाखामध्ये प्राप्त होईल, तसेच बँकेचे संकेत स्थळ www.shrirukminibank.com वर उपलब्ध आहे.
३) मा. सभासदांना वरील विषयासंबंधी काही प्रश्न अथवा सुचना करावयाच्या असल्यास त्यांनी त्या लेखी स्वरुपात दि. १३/०९/२०२३ अखेर श्रीगोंदा येथील बँकेच्या मुख्य कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत पोहोचतील अशा बेताने पाठवाव्यात.
४) ज्या सभासदांनी क्रियाशील राहण्यासाठी पोटनियमाप्रमाणे किमान धारण करावयाच्या भाग रक्कमेचा भरणा केलेला नाही, त्यांनी सदर रकमेचा त्वरीत भरणा करावा, तसेच बँकेच्या किमान सेवांचा लाभ घ्यावा अन्यथा त्यांना क्रियाशील सभासदाचे अधिकार राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.
५) सभासदांनी आपले सभासद अर्ज तपासून त्यातील माहिती, वारस नोंद बरोबर असल्याची खात्री करावी, फोटो, मोबाईल नंबर व इ–मेल दिले नसल्यास त्वरीत द्यावेत. तसेच ज्या सभासदांनी यापूर्वी लाभांश रक्कम घेतली नसेल त्यांनी मुख्य कार्यालयात / नजीकच्या शाखेमध्ये संपर्क साधुन ती घेऊन जावी.
६) सभासद खातेदारांनी/ग्राहकांनी आपली के.वाय.सी. कागदपत्रांची पूर्तता लवकरात लवकर करुन घ्यावी.
७) दि. १६/०९/२०२३ रोजी वार्षिक सभेचे कामकाज संपल्यानंतर सभासदांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन केलेले आहे. तरी सर्व सभासदांनी प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये अवश्य सहभाग घ्यावा.

* भावपूर्ण श्रद्धांजली *

अहवाल वर्षात देशाचे जे थोर देशभक्त, स्वातंत्र्य सेनानी, संशोधक, राजकीय, सामाजिक, सहकार, कला व साहित्य क्षेत्रातील व्यक्ती, शिक्षणतज्ञ, कवी, लेखक, खेळाडू, बँकेचे सभासद, हितचिंतक, ठेवीदार, खातेदार, ज्ञात, अज्ञात, पंचत्वात विलीन झाले. त्याचप्रमाणे देशाचे रक्षण करतांना आघाडीवर शत्रुंशी लढता लढता शहिद झालेले वीर जवान या सर्वांच्या कुटूंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो ही ईश्वर चरणी प्रार्थना, त्यांच्या पवित्र स्मृतीस या सभेमध्ये भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

- सभासद, ठेवीदार व कर्जदारांना सुचना -

१) सभासदांनी क्रियाशिल राहण्यासाठी पोटनियमाप्रमाणे किमान धारण करावयाच्या भाग रकमेचा भरणा केलेला नाही, त्यांनी सदर रकमेचा त्वरीत भरणा करावा व बँकेच्या सेवांचा लाभ घ्यावा व सतत क्रियाशील राहण्यांचा प्रयत्न करावा.

२) ज्या सभासद, खातेदार, ठेवीदार व ग्राहकांचे सेव्हिंग्ज/चालू ठेव खात्यावरील व्यवहार बरेच दिवसांपासून झालेले नाहीत, त्यांनी **के. वाय. सी.** पुर्तता करुन आपले खाते पुन्हा सुरु करुन व्यवहार करावेत.

३) ज्या सभासदांचे पत्ते बदलले असतील, त्यांनी ते बँकेच्या मुख्य कार्यालयात व शाखांमध्ये त्वरित कळवावेत.

४) श्री रुक्मिणी सहकारी बँक मर्या. ही आपली बँक असून आपण आपल्याच बँकेतील विविध ठेव, कर्ज, इतर योजना व सेवांचा लाभ घेऊन इतरांना आपल्या बँकेत ठेवी ठेवण्यास प्रवृत्त करावे व त्यांनीही बँकेतील सेवांचा लाभ घ्यावा.

५) कर्जदार सभासदांनी आपल्या कर्ज फेडीचा हप्ता रक्कम नियमीत भरणा करुन त्याची नोंद ठेवावी व ज्या कारणांसाठी कर्ज घेतले असेल ते त्याच कारणासाठी वापरावे.

६) कर्जदारांनी वेळच्या वेळी कर्ज फेड केल्यास त्याचा फायदा आपल्या सारख्याच इतर गरजू व्यक्तींना होईल हे नेहमी लक्षात ठेवा.

७) ज्या सभासदांनी/ग्राहकांनी खात्याचे वारसदार नाव नोंद बँकेच्या दप्तरी केली नसेल तर त्वरीत नोंद करुन घ्यावी. तसेच सभासदांनी/ग्राहकांनी त्यांचे मोबाईल नंबर व ई-मेल बँकेस त्वरीत कळवावेत, जेणेकरून बँकेमार्फत आपल्या खात्यावरील व्यवहारांची व बँकेच्या योजनांची माहिती त्वरीत मिळेल.

८) कर्जदार सभासदांनी कर्जाचा हप्ता नियमित भरुन आपले जामिनदार अडचणीत येणार नाहीत याची काळजी घ्यावी.

९) ज्या सभासदांनी बँकेत खाते उघडले नसेल, त्यांनी ते त्वरीत उघडावे व बँकेत व्यवहार करण्यास सुरुवात करावी.

१०) आयकर खात्याच्या नवीन बदललेल्या तरतुदीनुसार, ज्या आर्थिक वर्षात मुदत ठेवीवरील व्याज रु. ४०,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त होत असेल व ज्येष्ठ नागरीकांनी ठेवललेल्या मुदत ठेवीवरील व्याज रु. ५०,०००/- किवा त्यापेक्षा जास्त होत असेल तर त्यांनी बँकेच्या नजीकच्या शाखेत पॅन कार्ड झेरॉक्स व आयकर फॉर्म नं. १५ एच / १५ जी भरुन द्यावेत, अन्यथा सदर व्याज रकमेवर आयकर टी. डी. एस. कपात केला जाईल, याची नोंद घ्यावी.

११) नविन बदललेल्या आयकर कायद्यातील तरतुदीनुसार खातेदारांनी रु. २० लाख व त्यापेक्षा जास्त रक्कम रोख काढल्यास २% प्रमाणे टी.डी.एस. कपात करण्यात येईल व ज्या खातेदारांनी आयकर विवरणपत्रे नियमित भरले असेल त्यांच्यासाठी रोख रक्कम काढण्याची मर्यादा ३०० लाख आहे व रु. ३०० लाखापेक्षा जास्त रोख रक्कम काढली तर सदर रकमेवर २% अगर ५% प्रमाणे टी. डी. एस. कपात करण्यात येईल याची खातेदारांनी नोंद घ्यावी.

" २७ वा वार्षिक अहवाल " सन २०२२-२३

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

आपल्या बँकेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न होत आहे. या सभेसाठी आपणा सर्वांचे संचालक मंडळाच्या वतीने हार्दिक स्वागत. बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने दि. ३१ मार्च, २०२३ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा २७ वा अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रक आपणा समोर श्री संत शेख महंमद महाराजांच्या व ऐतिहासिक महत्व असलेल्या भुमीत सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. आपल्या बँकेने सर्वसामान्यांचे आर्थिक सबलीकरण व तळागाळापर्यंत बँकींग सेवा पोहचविण्याचा अत्यंत चांगला प्रयत्न केलेला आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यामध्ये "स्वायत्तत्ता" "लोकशाही नियंत्रण" "व्यावसायिकता" "कडक व स्वतंत्र लेखापरिक्षण" आणि इतर महत्वाचे बदलाचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर व्यवस्थापनाची फार मोठी जबाबदारी वाढलेली आहे व ही सर्व जबाबदारी बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी, सेवक वर्ग, ठेवीदार, कर्जदार, खातेदार व हितचिंतक सर्वांच्या सहकार्याने बँक उत्तमरीत्या पार पाडत आहेत आणि म्हणूनच आपली बँक ही सहकारातील एक आदर्श व कार्यक्षम बँक (संस्था) म्हणून नाव लौकीकास पात्र झालेली आहे.

खुल्या आर्थिक धोरणांच्या आर्थिक स्वायत्तेबरोबर स्पर्धात्मक युगामध्ये गुणवत्ता टिकवणे ही बँकेसमोर काळानुरुप आलेली जबाबदारी गतवर्षीप्रमाणे यावर्षीही बँकेने निश्चयपुर्वक पार पाडली आहे,सध्याच्या स्पर्धात्मक युगामध्ये बँकेची आर्थिक प्रगतीची घोडदौड सुरुच आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व सहकार खाते यांची नागरी सहकारी बँका बाबतची विविध धोरणे, मुक्त अर्थव्यवस्था, जागतिक घडामोडी व चांगले कर्जदार मिळविण्यासाठी करावे लागणारे प्रयत्न या पार्श्वभूमीवर सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतक यांनी बँकेवर ठेवलेल्या उदंड विश्वासावर बँकेने यशस्वी घोडदौड चालू ठेवलेली आहे.

आधुनिक काळात बँकिंग व तंत्रज्ञान यांची परस्पर सांगड घालुन बँकेच्या ग्राहकांना डिजिटलायझेशन (Digitalization) सेवा देण्यासाठी बँक प्रयत्नशिल आहे. त्या दृष्टीने आपले बँकेने ATM व मोबाईल बँकिंग (Mobile Banking), यु.पी.आय. (UPI) साठी रिझर्व बँक ऑफ इंडिया कडून परवानगी मिळवलेली आहे. त्यादृष्टीने ATM व मोबाईल बँकिंग यु.पी.आय. (UPI) कार्यान्वित होण्यासाठी बँक प्रयत्नशिल आहे. तसेच बँकेचा ATM, मोबाईल बँकिंग (Mobile Banking) व युपीआय (UPI) पेमेंट सिस्टीम लवकरच सुरू करीत आहोत. युपीआय (UPI) पेमेंट सिस्टीमद्वारे ग्राहकांना फंड ट्रान्सफर, लाईट बील, पाणी बील, रिचार्ज, विमा हप्ते इ. इतर अनुषंगीक व्यवहार करणे शक्य होईल, याप्रमाणे आधुनिक तंत्रज्ञानावर भर देऊन ग्राहकांना बँकिंग सुविधा देण्यास बँक कटिबद्ध आहे.

बँकिंग क्षेत्रातील आव्हाने :-

सध्या स्पर्धेच्या युगामध्ये नागरी सहकारी बँकापुढे अनेक आव्हाने आलेली आहेत. त्यामुळे सायबर सिक्युरीटी, आयकर बोजा, अनुत्पादित जिंदगीच्या तरतुदी, तंत्रज्ञानावर होणारा प्रचंड खर्च, मार्केटिंग, सायबर क्राईम, खाजगी व विदेशी बँका, राष्ट्रीयकृत बँका, पेमेंट बँका, निधी जोखीम, तरलता, क्रेडिट व्यवस्थापन, व्यवस्थापकीय मंडळ, बँकींग नियमन कायद्यात झालेले बदल, कोव्हीड १९ इत्यादींचा फार मोठ्या प्रमाणात नागरी सहकारी बँकींग क्षेत्रावर परिणाम झालेला आहे. त्यामधून अनेक अडचणींवर मात करुन नागरी सहकारी बँकिंग क्षेत्र भविष्यात उज्वल वाटचाल करतील अशी माझी मनोकामना आहे. तसेच या सर्व समस्या अडचणींवर मात करुन आपल्या बँकेची मुहूर्तमेढ ग्रामीण भागात झालेली असून बँकेने शहरी भागातही शाखा सुरु केलेल्या आहेत. बँकेने अतिशय उज्वल प्रगती आपल्या सर्वांच्या सहकार्याने केलेली आहे.

बँकेस मिळालेले पुरस्कार :-

बँकेस विविध संस्थांकडून दिले जाणारे राज्य व जिल्हा पातळीवरील महत्वाचे व मानाचे समजले जाणारे पुरस्कार बँकेस मिळालेले आहेत. त्यामध्ये (१) अविज पब्लिकेशन, कोल्हापूर व गॅलक्सी इन्मा यांच्याकडून विविध आर्थिक व इतर निकषावर दिला जाणारा बँको २०२१ हा पुरस्कार महाराष्ट्र, कर्नाटक व गुजरात या तीन राज्यांमधून आपल्या बँकेस मिळालेला आहे. तसेच सन २०२२-२३ या वर्षाचा बँको पुरस्कार बँकेस घोषीत झालेला आहे. (२) अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन मर्यादित, अहमदनगर यांच्याकडून सन २०२०-२१ साठी एन.पी.ए. (N.P.A.) कमी ठेवल्याबद्दल पुरस्कार मिळालेला आहे. असे पुरस्कार बँकेस प्राप्त झालेले आहेत, हे पुरस्कार संचालक मंडळ, सभासद, ठेवीदार, खातेदार, कर्जदार, ग्राहक, अधिकारी व सेवक वर्ग इ. यांच्या बहूमोल सहकार्यामुळेच मिळालेले आहेत, याची प्रचिती आपणास खालील आकडेवारीवरुन स्पष्ट होईल.

* बँकेची आर्थिक व सांपत्तीक स्थिती *

(रुपये लाखात)

तपशील	सन १५-१६	सन १६-१७	सन १७-१८	सन १८-१९	सन १९-२०	सन २०-२१	सन २१-२२	सन २२-२३
वसूल भाग भांडवल	२०८.०८	२४६.२०	२८४.५०	३२०.८३	३५२.९८	३७२.९७	३९५.०२	४००.४१
राखीव व इतर निधी	७७१.०८	९३६.२०	१०९३.१९	१२७५.७३	१४७८.२४	१८२१.३७	२२३६.२२	२६८९.४५
ठेवी	९४७८.७३	१०१२२.६१	१२८४४.४१	१४१२३.५६	१६७३९.०४	१८३२४.१२	१८४९९.५३	१९६१४.७५
कर्जे	५४८१.२८	६६७५.३०	७८३८.८५	८६४३.५७	९४८३.८०	१०७६८.४८	११३८०.३५	१०९९३.९२
गुंतवणूक	४३०१.६७	४१२८.८६	५७३१.३६	५९३१.२१	८४९५.९५	८९०९.८८	८७५४.५४	१०६५५.९७
निव्वळ नफा	११०.९६	१२३.०४	१४९.३७	१६५.८८	२०५.०९	२३५.९६	२६५.०५	२८३.१८
थकबाकी प्रमाण	१.७३%	२.०४%	२.५३%	२.३८%	३.२७%	४.१३%	३.४४%	५.६६%
खेळते भांडवल	१०९५४.४१	११९२९.२२	१४८८०.८५	१६४४३.३८	१९४४१.४३	२१४३८.५८	२२०८०.९५	२३७०२.२६
ऑडिट वर्ग	'' अ ''	'' अ ''	'' अ ''	'' अ ''	'' अ ''	'' अ ''	'' अ ''	'' अ ''

या व्यतिरिक्त अहवाल वर्षामध्ये बँकेने केलेल्या कामगिरीची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे देत आहोत.

* **माहिती व्यवस्थापन संगणक प्रणाली :-**

बँकिंग क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे व्यवस्थापनाचे महत्त्व लक्षात घेऊन बँकेने व्यवस्थापन व माहिती प्रणाली विकसीत करुन अंमलबजावणी केली आहे, त्यामुळे प्रत्येक अद्ययावत कामकाजाची माहिती उच्च स्तरीय व्यवस्थापनास त्वरीत मिळत आहे. सदर प्रणालीत वारंवार आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे आवश्यक ते बदल केले जातात, त्यामुळे बँकेच्या कामाचा व विकासाचा वेग वाढविण्यास चांगली मदत होत आहे. तसेच बँकेचे मुख्य कार्यालयासह व सर्व शाखांचे व्यवहार सी.बी.एस. (CBS) बँकिंग प्रणालीवर सुरु आहेत. त्यामुळे त्याचा फायदा बँकेचे सभासद, कर्जदार, ठेवीदार व ग्राहकांना होत आहे. त्याचप्रमाणे बँकेचे मोबाईल बँकींग, ATM व UPI पेमेंट सुरु करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलेली असून सभासद, खातेदार व ग्राहक यांच्या सेवेसाठी लवकर मोबाईल बँकींग, ATM व UPI पेमेंट इ. सेवा लवकरच सुरु करीत आहोत.

* **संचालक मंडळ सभा :-**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १२ सभा झालेल्या आहेत, तसेच रिझर्व्ह बँके ऑफ इंडियाच्या निर्देशानुसार व्यवस्थापकीय मंडळ (Bom.) लेखापरिक्षण समिती, गुंतवणूक समिती,सेवक समिती, वसुली समिती व ॲसेट लायबीलीटी समिती इत्यादी च्या नियमित सभा झालेल्या असून सभेतील कामकाजात ग्राहक हित आणि सेवाभाव डोळ्यासमोर ठेवून त्यादृष्टीने कामकाज झाले आहे व सर्व संचालक सदस्यांनी सभांमध्ये आपुलकीने सहभाग घेऊन सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

* **अधिकृत भाग भांडवल (Authorised Share Capital) :-**

दि. ३१ मार्च २०२३ रोजी बँकेचे अधिकृत भाग भांडवल रु. १० कोटी रुपये इतके आहे.

* **सभासद व वसुल भाग भांडवल (Member Working Capital) :-**

दि. ३१ मार्च २०२३ रोजी बँकेची एकूण सर्वसाधारण सभासद संख्या ३९९६ इतकी आहे व वसुल भाग भांडवल रु. ४,००,४०,७५०/- इतके आहे. अहवाल सालात भाग भांडवलामध्ये रु. ५,३९,२००-०० ने निव्वळ वाढ झालेली आहे.

* **राखीव व इतर निधी (Reserve Fund and Other Funds) :-**

गतवर्ष अखेर बँकेची राखीव व इतर निधी खाती रक्कम रु. २२,३६,२२,२३१.८४ इतकी होती, सन २०२२-२३ या अहवाल वर्षात त्यामध्ये रक्कम रु. ४,५३,२२,९०२.१८ ने निव्वळ वाढ होऊन, ती दि. ३१ मार्च २०२३ रोजी रु. २६,८९,४५,१२३.०२ इतकी झालेली आहे. निधीची तरतुद करताना व्यवस्थापनाने सर्व आवश्यक बाबी विचारात घेऊन पुरेशा तरतुदी केलेल्या आहेत.

कोणत्याही सहकारी संस्थेची आर्थिक स्थिती ही त्या संस्थेच्या निधीवर अवलंबून असते म्हणून संचालक मंडळाने बँक स्थापनेपासून खर्चात काटकसर व बचत करुन निधीमध्ये भरघोस वाढ करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केलेले आहेत हे वरील आकडेवारीवरुन दिसून येत आहे.

❊ दि. ३१ मार्च २०२३ रोजीचा राखीव व इतर निधीचा तपशील खालील प्रमाणे आहे. ❊

अ.नं.	तपशिल	रक्कम रुपये
१)	राखीव निधी	४,९९,७९,६६४=८१
२)	इमारत निधी	५,५३,००,०००=००
३)	लाभांश समिकरण निधी	१३,६०,०००=००
४)	धर्मादाय निधी	३,७०,०००=००
५)	सभासद कल्याण निधी	१७,३०,०००=००
६)	कर्मचारी कल्याण निधी	७,६०,०००=००
७)	उत्तम कर्जावरील तरतुद	५९,००,०००=००
८)	अनुत्पादनक्षम कर्जावरील तरतुद	६,२८,०१,५३६=००
९)	अनुत्पादनक्षम कर्जावरील तरतुद (घर व शेती)	१,४१,७०,३००=००
१०)	गुंतवणूक घसारा निधी	२,१०,१०,०००=००
११)	गुंतवणूक चढ-उतार निधी	३,९२,५०,०००=००
१२)	समारंभ निधी	३,१४,५८२=२१
१३)	आकस्मीत निधी	२,६५,०००=००
१४)	सभासद, संचालक व सेवक प्रशिक्षण निधी	५,४४,०५०=००
१५)	माहिती व तंत्रज्ञान निधी	१९,६०,०००=००
१६)	शाखा विस्तार निधी	१,६५,०००=००
१७)	सामाजिक बांधिलकी निधी	५,३०,०००=००
१८)	सिल्व्हर ज्युबली निधी	२२,२५,०००=००
१९)	डेफर्ड इन्कम टॅक्स निधी	९,२०,०००=००
२०)	अतिरिक्त वाढीव राखीव निधी टायर - १	१७,४०,०००=००
२१)	मुक्त निधी टायर - १	६१,५०,०००=००
२२)	निवडणूक निधी	१५,००,०००=००
	एकूण रक्कम रु.	**२६,८९,४५,१३३=०२**

गत वर्षीच्या तुलनेत राखीव व इतर निधीमध्ये २०.२७% नी निव्वळ वाढ झालेली आहे. राखीव व इतर निधीतील भरीव वाढ ही बँकेच्या आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने निश्चितच चांगली बाब आहे.

❊ **ठेवी (Deposits):-**

दि. ३१ मार्च २०२२ अखेर बँकेने विविध ठेव योजनेद्वारे एकुण रक्कम रु. १,८४,९९,५२,५३५.२६ इतक्या ठेवी संकलन केल्या होत्या, अहवाल वर्षात त्यामध्ये रक्कम रु. ११,१५,२२,०५४.७२ ने निव्वळ वाढ झालेली असून, दि. ३१ मार्च २०२३ अखेर बँकेच्या एकूण ठेवी रु. १,९६,१४,७४,५८९.९८ इतक्या आहेत.

बँकेचे सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतक यांचे बँकेवर असलेले प्रेम, विश्वास तसेच कार्यशील व अभ्यासू संचालक मंडळ, सुशिक्षित व सुस्मित अधिकारी व सेवक वर्ग, दैनंदिन ठेव प्रतिनिधी इ.चे अथक परिश्रम व परस्परांवरील विश्वासामुळे ठेवीमध्ये वाढ झालेली आहे हे सांगण्यात खरोखरच धन्यता वाटते. अहवाल वर्षात आर्थिक धोरणातील बदलामुळे ठेवीवरील व्याजदर वेळोवेळी बदलत गेले आहेत, ठेवीदारांनी ठेव ठेवतांना विचार करुन श्री रुक्मिणी सहकारी बँक लि. मध्येच ठेवी ठेवलेल्या आहेत.

❊ **ठेव विमा संरक्षण (Deposit Insurance) :-**

ठेवीच्या रकमेचे सुरक्षितेसाठी बँक सप्टेंबर व मार्च या दोन्ही सहामाही अखेर दरवर्षी "डिपॉझिट इन्शूरन्स ॲण्ड क्रेडीट गॅरंटी कार्पोरेशन, मुंबई" या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ठेव विमा विभागास सहामाही हप्ता मुदतीत व नियमित पाठविलेला आहे., या योजने अंतर्गत सर्व पात्र ठेवींना विम्याचे पूर्ण संरक्षण आहे, त्यामुळे श्री रुक्मिणी बँकेतील ठेवीमधील गुंतवणूक जास्तीत जास्त सुरक्षित आहेत.

* **कर्जे (Loans) :-**

बँकेने ठेवी, भाग भांडवल व निधी रुपाने जमा झालेली रक्कम सहकार खाते व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे पतपुरवठा धोरण व कर्ज विषयक आदेश, नियम, लाभप्रदता तसेच बँकेचे पतपुरवठा विषयक धोरण या सर्वांचा योग्य समन्वय साधुन सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी व उद्योग-व्यवसायाच्या प्रगती, भरभराटीसाठी विविध प्रकारच्या कर्ज योजनांद्वारे वाटप करुन सभासदांना अर्थसाह्य केलेले आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे

दि. ३१ मार्च २०२३ अखेर एकूण कर्ज वाटपाचा तपशिल खालील प्रमाणे

अ.नं.	कर्ज प्रकार	रक्कम रु. लाखात
(अ)	अल्प मुदत कर्जे	४,२२५.१८
(ब)	मध्यम व दिर्घ मुदत कर्जे	६,७६८.७३
	एकुण रक्कम (अ+ब) रु.	**१०,९९३.९१**

वरीलप्रमाणे कर्ज वाटप करतांना कर्जाचे कारण, परतफेड क्षमता, कर्जास देऊ केलेले तारण, कर्ज विनियोग, कर्जदाराची आर्थिक परिस्थिती, उत्पन्नाचे मार्ग, पत या कर्ज वाटपा संबंधीच्या इ. महत्वाच्या बाबी व निकषावर कर्ज अर्जाची छाननी करुन कर्जवाटप केलेले आहे, दि. ३१/३/२०२३ अखेर बँकेचे ढोबळ एनपीए प्रमाण ५.७२% व निव्वळ एनपीए प्रमाण ०% ठेवण्यात बँकेस यश आलेले आहे. बँकेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत उल्लेखनीय आहे.

कर्ज वाटप करताना बँकेने अग्रक्रम क्षेत्रास, एकूण कर्जाच्या ७४.०८% इतका कर्ज पुरवठा केलेला असून त्यापैकी दुर्बल घटकास एकूण कर्जाच्या २०,९७% इतका कर्ज पुरवठा केलेला आहे. अशा प्रकारे बँकेने अग्रक्रम क्षेत्र व दुर्बल घटकास कर्जपुरवठा करुन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्देशांची पूर्णपणे पालन करून पुर्तता केलेली आहे.

* **कर्ज थकबाकी (Loan Overdues) :-**

दि. ३१ मार्च २०२३ अखेर कर्ज थकबाकीचे एकूण येणे कर्जाशी शेकडा प्रमाण ५.६६ % इतके आहे.बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी व सेवक वर्ग कर्ज थकबाकी वसूलीसाठी सतत तत्पर राहून कर्ज थकबाकी कमीत कमी ठेवण्यासाठी प्रयत्नशिल असतात याचा मला सार्थ अभिमान आहे. बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी व सेवक वर्ग यांनी वसूलीची अभिनव पद्धत शोधून तिचा अवलंब करुन थकबाकी वसूलीसाठी जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे प्रयत्न केलेला आहे.

* **अनुत्पादक कर्जे (NPA) :-**

बँकेने बाजारातील प्रतिकुल परिस्थिती व अर्थव्यवस्थेतील चढउतार अशा परिस्थितीतही उत्तम प्रकारे कर्ज वसुली करुन एनपीए प्रमाणात घट घडवून आणलेली आहे. दि. ३१/३/२०२३ अखेर बँकेची अनुत्पादनक्षम कर्जे रु. ६२९.०६ लाख असून त्याचे एकूण कर्जाशी शेकडा प्रमाण ५.७२% इतके असून निव्वळ अनुत्पादीत कर्जाचे प्रमाण ०% आहे. वसूलीचे योग्य नियोजन व सभासद कर्जदार यांचे सहकार्य, संस्थेविषयी असणारी आत्मीयता व विश्वास याद्वारे आपण अनुत्पादनक्षम कर्जाचे प्रमाण मर्यादीत ठेवू शकलो. यापुढेही हे प्रमाण यापेक्षा कमी करण्यासाठी सर्व सभासद कर्जदारांचे सहकार्य अपेक्षित आहे.

* **संचालक व त्यांचे नातेवाईक यांना केलेला कर्ज पुरवठा :-**

बँकेने सन २०२२-२३ अखेर संचालक व त्यांचे नातेवाईकांना कोणत्याही प्रकारचे कर्ज वाटप केलेले नाही. यावरुन हे स्पष्ट होते की, बँकेचे संचालक मंडळ हे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व सहकार खाते यांच्या आदेशाचे/परिपत्रकांचे काटेकोर व पूर्णपणे पालन करीत आहे.

* **भांडवल पर्याप्तता प्रमाण** (CRAR) **:-**

दि. ३१ मार्च २०२३ रोजी बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण २४.५२ % इतके आहे. रिझर्व्ह बँकेच्या निर्देशाप्रमाणे हे प्रमाण किमान ९% असणे अपेक्षित आहे यावरुन आपल्या बँकेचे आर्थिक स्थैर्य उत्तम आहे हे सिद्ध होते.

* **नक्त मुल्य** (Net Worth) **:-**

बँकेचे गतवर्षी नक्त मुल्य रु. २,२२२.३१ लाख होते. दि. ३१/३/२०२३ अखेर आपल्या बँकेचे नक्त मुल्य रु. १,८५३.८६ लाख इतके आहे. संचालक मंडळ नक्त मुल्य वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्नशिल आहे. वाढीव नक्त मूल्यामुळे (Net Worth) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कडून आपणांस ग्राहकांसाठी ज्यादा सेवा देण्यासाठी मान्यता / शिथिलता मिळते.

* **एस. एम. एस. अलर्ट व मिस कॉल अलर्ट सुविधा** (SMS & Missed Call Alert) **:-**

बँकेच्या खातेदाराने बचत खाते, चालू खाते, कर्ज खाते, कॅश क्रेडिट खाते व इतर खाते या खात्यावर रोख रक्कम, समाशोधन (Clearing), हस्तांतरण (Transfer) स्वरुपात जमा व नावे असे व्यवहार केल्यास SMS द्वारे कळविले जात आहेत. तसेच बँकेने Missed Call Alert सुविधा ०७९४९१३०४८९ या नंबरवर कार्यान्वित केलेली आहे. त्यामुळे बँकेच्या ग्राहकाने सदर नंबरवर missed call दिल्यास त्यांना त्वरीत त्यांच्या खात्यावरील शिल्लक रकमेची माहिती मिळत आहे. तरी सर्व सभासदांनी/खातेदारांनी/ग्राहकांनी आपले मोबाईल क्रमांक संबंधीत शाखांना लेखी अर्जाद्वारे कळवावेत व खातेदारांनी / ग्राहकांनी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ मिळेल.

* **आर.टी.जी.एस. व एन.ई.एफ.टी.** (RTGS / NEFT) **:-**

आपल्या बँकेने ॲक्सिस बँकेमार्फत आर.टी.जी.एस. / एन.ई.एफ.टी. (RTGS/NEFT) प्रणालीची सुविधा खातेदारांसाठी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यांचा सर्व सभासद, खातेदार, ठेवीदार लाभ घेत आहेत. तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया च्या परिपत्रकास अनुसरुन RTGS / NEFT ची सेवा सर्व खातेदारांसाठी विनामुल्य केलेली आहे.

* **आय. एफ. एस. कोड** (IFS Code) **:-**

आपल्या बँकेच्या सर्व शाखांसाठी ॲक्सिस बँक व कोटक महिंद्रा बँक लि. या बँकेमार्फत आय. एफ. एस. कोड (IFS Code) सुविधा घेतलेली असून खातेदारांनी RTGS/NEFT द्वारे रक्कम ग्राहकाच्या खात्यामध्ये हस्तांतर करता येईल. प्रत्येक शाखेला IFS Code दिलेला आहे. त्यामार्फत ठेवीदार, खातेदार, सभासद व इतर ग्राहकांना रक्कम हस्तांतर करता येईल, त्यादृष्टीने शाखांना सुचना देऊन शाखांचा IFS Code नोटीस बोर्डावर लावलेला आहे, तरी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ खातेदारांना घेता येईल.

* **नॅच सुविधा** (NACH) **:-**

आपल्या बँकेने कोटक महिंद्रा बँकेमार्फत नॅच सुविधा (NACH) खातेदारांसाठी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यासाठी सभासद, ग्राहकांनी गॅस सबसिडी, पी. एम. किसान व इतर सबसिडीसाठी आपल्या बँकेचे नाव व खाते नंबर देण्यात यावेत व त्याचा सर्व सभासद, खातेदार, ठेवीदार व ग्राहक यांनी लाभ घ्यावा.

* **गुंतवणूक (Investments) :-**

दि. ३१ मार्च २०२३ अखेर बँकेची एकूण गुंतवणूक रु. १०,६५५.९७ लाख इतकी आहे. बँकेने स्थापनेपासून रोखता व तरलता निधी किमान राखावयाच्या आवश्यक प्रमाणापेक्षा जास्त राखलेले आहे. बँकेकडून किमान राखावयाचे प्रमाणाबाबत केव्हाही उल्लंघन झालेले नाही.

सरकारी रोखे खरेदी-विक्री व्यवहारात अंगभुत असलेल्या जोखीमीचे उत्तम व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने बँकेने गुंतवणूक चढ उतार निधी रु. ३९२.५० लाख व गुंतवणूक घसारा निधी रु. २१०.१० लाख उभारलेला आहे, बँकेने गुंतवणूक घसारा निधी रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक तरतुदीपेक्षा जास्त रक्कमेने उभारलेला आहे. तसेच अहवाल कालावधीत बँकेने सरकारी कर्ज रोखे खरेदी विक्रीतून रु. २४.०७ लाख इतका नफा मिळविलेला आहे.

* **नफा विभागणी (Distribution of Profits) :-**

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात आयकर व सर्व तरतुदी करुन बँकेस रक्कम रु. रु. २,८३,१८,२०२.५७ इतका निव्वळ नफा झालेला आहे. सदर नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करावी अशी शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

*** नफा विभागणी ***

अ.नं.	तपशील	रक्कम रु.
१.	राखीव निधी	७०,८०,०००=००
२.	सभासद भाग लाभांष १२%	४७,७५,०००=००
३.	इमारत निधी	४०,००,०००=००
४.	सभासद कल्याण निधी	३,००,०००=००
५.	धर्मादाय निधी	५०,०००=००
६.	कर्मचारी कल्याण निधी	१,००,०००=००
७.	लाभांश समिकरण निधी	५०,०००=००
८.	गुंतवणुक चढ-उतार निधी	९०,००,०००=००
९.	डेफर्ड आयकर निधी	१,५०,०००=००
१०.	समारंभ निधी	१३,२०२=५७
११.	सभासद/संचालक/कर्मचारी प्रशिक्षण निधी	१,००,०००=००
१२.	माहिती व तंत्रज्ञान निधी	२,५०,०००=००
१३.	शाखा विस्तार निधी	१,००,०००=००
१४.	सिल्व्हर ज्युबीली निधी	५,००,०००=००
१५.	सामाजिक बांधिलकी निधी	५०,०००=००
१६.	मुक्त निधी टायर - १	१६,००,०००=००
१७.	अतिरिक्त वाढीव राखीव निधी टायर - १	२,००,०००=००
	एकूण रक्कम रूपये	**२,८३,१८,२०२=५७**

* **सहकारी बँकांच्या नफ्यावर कर आकारणी (Income Tax) :-**

केंद्र सरकारने आर्थिक वर्ष २००७-०८ पासुन आयकर कायदा १९६१ च्या कलम ८० पी मध्ये दुरुस्ती करून सहकारी बँकांच्या नफ्यावर कर आकारणी लागू केलेली आहे. आपल्या बँकेने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये रु. ११९.७७ लाख रक्कम आयकर स्वरुपात सरकारी तिजोरीत जमा केलेले आहेत.

* **मुदत ठेवीवरील व्याज उत्पन्नावर उद्गम कर कपात (TDS) :-**

आयकर कलम कायदा 194A (3) (V) मध्ये सुधारणा करण्यात आलेली असुन बँकेतील सर्व शाखांमध्ये ठेवलेल्या सर्व प्रकारच्या मुदत व आवर्त ठेवींवर, जर त्यांचे एका आर्थिक वर्षामध्ये अपेक्षित एकत्रित व्याज रु. ४०,०००/- पेक्षा जास्त होत असल्यास, तसेच ज्येष्ठ नागरिकांना ठेवलेल्या ठेवीवरील व्याज रु. ५०,०००/- व त्यापेक्षा जास्त होत असल्यास सदर आयकर कायद्यातील तरतुदीनुसार उद्गम कर कपात (TDS) हा दर तिमाहिस (जुन, सप्टेंबर, डिसेंबर व मार्च) कपात केला जाणार आहे तरी सर्व ठेवीदारांनी याची नोंद घ्यावी.

जर मुदत व आवर्त ठेव ठेवणारे ठेवीदार यांचे वार्षिक उत्पन्न आयकर कायद्यानुसार रु., २,५०,०००/- पेक्षा कमी असेल तसेच जे ठेवीदार ६० वर्षापेक्षा कमी वयाचे असतील व त्यांनी 15 G फॉर्म जर उद्गम कर कपात होण्याच्या अगोदर बँकेच्या शाखेत भरून दिल्यास त्याची करकपात केली जाणार नाही.

तसेच ज्या ठेवीदाराचे वय ६० वर्षापेक्षा जास्त असल्यास व त्यांचे वार्षिक उत्पन्न आयकर कायद्यानुसार रु. ३,००,०००/- पेक्षा कमी असेल तसेच अति ज्येष्ठ व्यक्तींचे उत्पन्न रु. ५,००,०००/- पेक्षा कमी असेल. अशा ठेवीदाराने 15 H फॉर्म जर बँकेच्या शाखेत उद्गम कर कपात (TDS) होण्या अगोदर भरून दिल्यास, त्यांची कर कपात केली जाणार नाही, त्यासाठी प्रत्येक ठेवीदाराचा पॅनकार्ड नंबर (PANCARD NUMBER) असणे आवश्यक आहे.

प्रत्येक मुदत ठेवीदाराने पॅनकार्ड नंबर दिला असल्यास व 15G / 15H फॉर्म दिला नसल्यास उद्गम कर कपात १०.००% व पॅनकार्ड नंबर दिला नसल्यास २०% दराने कपात करण्यात येईल याबाबत अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेत संपर्क साधावा.

* **डॉर्मंट खाते (Dormant Account) :-**

भारतीय रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया च्या नियमानुसार सतत २ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीमध्ये झालेली बचत व चालू ठेव खात्यावर कोणत्याही प्रकारचा व्यवहार झाला नसेल तर ते खाते डॉर्मंट खाते म्हणून त्याची वर्गवारी केली जाते. सदरील खाते पूर्ववत सुरु करण्यासाठी शाखा कार्यालयामध्ये जावून **KYC** चे निकष पूर्ण करुन खात्यावर नियमित व्यवहार करणे आवश्यक आहे.

* **ठेवीदार शिक्षण व जागरुकता निधी (DEAF) :-**

भारतीय रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया च्या नियमानुसार सतत १० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी व्यवहार न झालेली बचत खाती, चालू खाती व विविध प्रकारच्या मुदत ठेवी व इतर जमा अशा प्रकारच्या खात्यामधील शिल्लक रक्कम भारतीय रिझर्व्ह बँकेच्या **DEAF** खात्यामध्ये जमा करण्यात येतात, तरी सभासद, ठेवीदार व खातेदार यांनी याबाबत नोंद घ्यावी. त्यासाठी खातेदारांनी **KYC** (आपला ग्राहक ओळखा) चे निकष पूर्ण करुन खात्यावर नियमित व्यवहार सुरु करावेत.

* **आर्थिक दृष्ट्या सक्षम बँक (Financialy Sound & Well Managed Bank) :-**

आपले बँकेने रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया च्या परिपत्रकाप्रमाणे आर्थिक दृष्ट्या सक्षम बँकेचे (Financialy Sound & Well Managed Bank) सर्व निकष पुर्ण केलेले आहे हे आवर्जुन या ठिकाणी नमूद करावेसे वाटते.

* **पॉझिटिव्ह पे सिस्टिम (Positive Pay System) :-**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे दिनांक २५/०९/२०२० रोजीच्या परिपत्रकानुसार दि. ०१/०१/२०२१ पासून खातेदाराने रक्कम रु. ५,००,०००/- व त्या पुढील दिलेल्या चेकची माहिती बँकेस SMS/मोबाईल ॲप/इंटरनेट बँकिंग/इ-मेल/पत्र बँकेस देणे बंधनकारक आहे.

* **के.वाय.सी. नॉर्मची पुर्तता करणेबाबत (K.Y.C.) :-**

बँकेच्या सर्व खातेदारांना कळविण्यात येते की, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्देशानुसार जुन्या व नविन सर्व खातेदारांना के. वाय. सी. नॉर्मस्ची पुर्तता करणे आवश्यक आहे, त्यासाठी सर्व खातेदारांना सुचित करण्यात येत आहे की, आपले ज्या शाखेत खाते आहे त्या शाखेतील शाखा व्यवस्थापकांशी संपर्क साधून आपल्या खात्याची के. वाय. सी. निकषांची पुर्तता लवकरात लवकर करुन घ्यावी.

* **वैधानिक लेखापरिक्षण (Statutory Audit) :-**

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण मे. नहार जैन ॲण्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकौंटंट्स, बीड यांनी केलेले आहे. त्यांनी बँकेस बहुमूल्य मार्गदर्शन करुन बँकेस सहकार्य केलेले आहे. त्यांनी बँकेच्या एकूण कामकाजाबाबत समाधान व्यक्त केलेले असून सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता बँकेस लेखापरिक्षण **"अ"** वर्ग प्रदान केलेला आहे.

* **समावर्ती लेखापरिक्षण (Concurrent Audit) :-**

सन २०२२-२३ या वर्षाचे समावर्ती लेखापरिक्षण मे. मंगेश एम. शेंडे आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे यांनी केलेले आहे. लेखापरिक्षण कालावधीत समावर्ती लेखापरिक्षकांनी बँकेस वेळोवेळी बहुमूल्य असे मार्गदर्शन केले असून त्यांनी बँकेच्या एकूण कामकाजाबाबत समाधान व्यक्त केलेले आहे.

* **भारतीय रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडून तपासणी :-**

बँकेची दि. १/४/२०१८ ते ३१/३/२०२२ या कालावधीची रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून तपासणी झालेली आहे. सदर तपासणी अहवाल बँकेस प्राप्त झालेला असून सदर अहवालातील दोषांची पूर्तता करून त्याचा दोष दुरुस्ती अहवाल रिझर्व बँक ऑफ इंडियाकडे मुदतीत पाठविलेला आहे.

* शाखा विस्तार :-

बँकेचे कार्यक्षेत्र अहमदनगर, पुणे, सोलापुर, ठाणे, नाशिक, बीड व औरंगाबाद या सात जिल्ह्यापुरते मर्यादित आहे. दि. ३१ मार्च २०२३ अखेर बँकेच्या श्रीगोंदा, कर्जत, बेलवंडी बु ।।, मिरजगाव, अहमदनगर, (जि. अहमदनगर), शिक्रापूर, आंबेगाव बु।। , नऱ्हे, पिंपळे जगताप, (चौफुला) व मांडवगण फराटा (जि. पुणे) अशा दहा शाखा कार्यरत आहेत. तसेच रिझर्व बँक ऑफ इंडिया कडून बँकेस कोळगाव (अहमदनगर) व कासुर्डी (पुणे) या ठिकाणी नविन शाखा सुरु करण्यासाठी परवानगी मिळालेली आहे.

* सामाजिक बांधिलकी व उपक्रम :-

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिवशी माहे मार्च २०२३ अखेर झालेल्या एसएससी व एचएससी बोर्डाच्या १० वी व १२ वी परिक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेले विद्यार्थी/ विद्यार्थीनी, यु.पी.एस.सी., एम.पी.एस.सी. व इतर विशेष प्राविण्य मिळविलेले विद्यार्थी यांचा सत्कार करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी संबंधीत विद्यार्थी, विद्यार्थीनी, पालकांसह वार्षिक सभेच्या ठिकाणी सत्कार स्विकारण्यासाठी उपस्थित रहावे, ही विनंती.

* सेवक वर्ग व प्रशिक्षण :-

बँकेतील सेवक वर्ग हा बँकींग व्यवसायाचा महत्वाचा घटक आहे त्यांची काम करण्याची तत्परता, नैतिकता, सौजन्य, उत्साह, क्षमता व पद्धत यावर बँकेची प्रगती अवलंबून असते. बँक कर्मचाऱ्यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज जबाबदारीने पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे, त्यांचेही मी संचालक मंडळाच्या वतीने आभार मानतो. त्यांनी बँकेचे सभासद, ठेवीदार, खातेदार, ग्राहक व हितचिंतक यांना आणखी जास्तीत जास्त उत्तम व चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा प्रयत्न करावा, असे मी त्यांना आव्हान करतो.

आपण प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षीसुद्धा सभासद, संचालक, अधिकारी व सेवक प्रशिक्षणावर पुरेसा भर दिलेला आहे. स` व क वर्गाची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने सहकार खात्यातर्फे तसेच अहमदनगर जिल्हा नागरी बँक असोसिएशन, पुणे जिल्हा नागरी बँक्स असोसिएशन, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर बँकींग पुणे, राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र यांनी आयोजित केलेल्या अभ्यासक्रमास पाठवून सेवक व संचालकांना नियमित प्रशिक्षण दिलेले आहे. दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशनच्या ऑनलाईन प्रशिक्षण केंद्राकरिता बँकेने सभासदत्व स्विकारलेले आहे, त्यामुळे कर्मचाऱ्यांना बँकेच्या मुख्य कार्यालयात एका ठिकाणी असोसिएशन मार्फत तज्ञ व्यक्तीकडून ऑनलाईन प्रशिक्षण दिले जात आहे. बँकींग व्यवसायात होणारे बदल व त्याची दैनंदिन कामकाजामध्ये अंमलबजावणी करणे हे महत्वाचे काम सेवक वर्गावर अवलंबून आहे. तसेच बँकिंग व्यवसाय वृद्धींगत होणेच्या दृष्टीने सभासदांना देखील प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने बँकेच्या माध्यमातून सदरचे कामकाज चालू आहे. सेवक वर्गाने केलेल्या कामाबाबत व सभासदांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो.

* सन्माननीय भेटी/मार्गदर्शन :-

बँकेस सन २०२२-२३ या सहकारी वर्षात ज्या मान्यवर व्यक्ती व अधिकारी यांनी भेटी देऊन उपयुक्त बहुमोल असे मार्गदर्शन केले आहे आणि बँकेचे व्यवहार, कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे त्यांचा मी ऋणी आहे.

*** आभार :-**

अहवाल वर्षात संचालक मंडळातील सर्व सदस्य, सभासद, अधिकारी व सेवक वर्ग, खातेदार, ठेवीदार व हितचिंतक या सर्वांनी बँकेच्या नियमित कामकाजाबाबत मला दिलेल्या बहूमोल सहकार्याबद्दल मी त्यांचे संचालक मंडळाच्या वतीने मन:पुर्वक आभार मानतो.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाचे केंद्रिय व विभागीय कार्यालय, मुंबई/नागपूर, मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, श्रीगोंदा, जिल्हा विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था, वर्ग-१ अहमदनगर व त्यांचे कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच बँकेचे गोल्ड व्हॅल्युअर, जागा मालक, प्रशिक्षण देण्यास मदत करणारी सहकार भारती व इतर मान्यताप्राप्त संस्थांचे पदाधिकारी तसेच प्रशिक्षक व अन्य मान्यवरांनी अत्यंत मोलाचे सहकार्य केलेले आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई, दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती बँक मर्या, पुणे जिल्हा मध्यवती बँक मर्या. आयडीबीआय बँक, आयसीआयसीआय बँक, ॲक्सिस बँक, कोटक महिंद्र बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, अहमदनगर शहर सहकारी बँक लि., अहमदनगर,दि बारामती सहकारी बँक लि. बारामती, शरद सहकारी बँक लि. मंचर, बँकेच्या कार्यक्षेत्रातील जिल्हे व तालुक्यातील सर्व संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी व सेवक वर्ग तसेच इतर सहकारी बँकेतील अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेले मार्गदर्शन व सहकार्याबद्दल त्यांचे संचालक मंडळाच्या वतीने आभार मानतो.

दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन, मुंबई, महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन लि.,मुंबई, अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, शासकीय लेखापरिक्षक, समावर्ती लेखापरिक्षक, कर लेखापरिक्षक, ज्ञात व अज्ञात हितचिंतक व पत्रकार यांचेही सहकार्य लाभले आहे त्यांचेही मी सर्व संचालक मंडळाच्या वतीने आभार मानतो.

*** समारोप :-**

'एकमेका साह्य करुन अवघे धरू सुपंथ' हे ध्येय बाळगुन बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी व सेवक वर्ग बँकेच्या प्रगतीसाठी सतत व दक्षपणाने कार्यरत आहे वर्षभरात या सर्वांचे बहूमुल्य सहकार्य लाभले आहे.

तसेच बँकेचे मान्यवर सभासद, ठेवीदार, खातेदार, हितचिंतक आणि आपणा सर्वांचा बँकेवर असलेला दृढ विश्वास यामुळेच आपली बँक प्रगती करू शकलो आणि आपल्या सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा ठेवुन बँकेच्या विविध योजनासाठी व बँकेच्या प्रगतीसाठी आपले सहकार्य यापुढेही मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो व बँकेचा वटवृक्ष असाच वाढत राहो अशी श्री. विठ्ठल रुक्मिणी व श्री संत शेख महंमद महाराज चरणी प्रार्थना करतो व पुन:श्च एकदा सर्वांचे मन:पुर्वक आभार मानून मा. संचालक मंडळाच्या वतीने हा अहवाल आपल्या मंजुरी करीता सादर करीत आहे.

जय हिंद ! **जय महाराष्ट्र !!** **जय सहकार !!**

आपला स्नेहांकित,
सीए श्री. वसंतराव बापुराव गुंड
चेअरमन
श्री रुक्मिणी सहकारी बँक लि. श्रीगोंदा

स्थळ : श्रीगोंदा
दिनांक : ३१/०८/२०२३

FORM No. N-1

[See section 81 and rule 69 (3)]

INDEPENDENT AUDITOR'S REPORT

To,
The Members
Shri. Rukmini Sahakari Bank Ltd
Shrigonda
Ref.: - Appointment Letter Reference No. S.R.S.B/413/2022-2023

A. Report on the Financial Statements as a Statutory Auditor

We have audited the accompanying financial statements of **Shri. Rukmini Sahakari Bank Ltd**, shrigonda, Dist-Ahmednagar which comprise the Balance Sheet as at 31st March 2023 and the Statement of Profit and Loss for the year ended, and a summary of significant accounting policies and other explanatory information incorporated in these financial statements of the Bank along with its Branches audited by us for the period 1st April 2022 to 31st March 2023.

B. Management's Responsibility for the Financial Statements

Management is responsible for the preparation of these financial statements that give a true and fair view of the financial position, financial performance and cash flow of the Bank in accordance with the Banking Regulation Act 1949 (as applicable to co-operative societies), the guidelines issued by the Reserve Bank of India and the guidelines issued by the National Bank for Agricultural and Rural Development, the Registrar of Co-operative Societies, Maharashtra, the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, and the Maharashtra Co-operative Societies Rules, 1961, (as applicable) and generally accepted accounting principles in India so far as applicable to the Bank. This responsibility includes design, implementation and maintenance of internal control relevant to the preparation of the financial statements that are free from material misstatement, whether due to fraud or error.

C. Auditor's Responsibility

Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We conducted our audit in accordance with Standards on Auditing issued by the Institute of Chartered Accountants of India. Those Standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatements.

An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The procedures selected depend on the auditor's judgment, including the assessment of the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal control relevant to the Bank's preparation and fair presentation of the financial statements in order to design audit procedures that are appropriate in the circumstances, but not for the purpose of expressing an opinion on effectiveness of the Bank's internal control. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of the financial statements.

We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion.

D. Qualified Opinion

In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the aforesaid financial statements together with the Notes thereon give the information required by the Banking Regulation Act, 1949 (as applicable to cooperative societies), the Maharashtra Cooperative Societies Act, 1960, the Maharashtra Cooperative Societies Rules, 1961 and the guidelines issued by the National Bank for

Agricultural and Rural Development (as applicable) and guidelines issued by Reserve Bank of India and Registrar of Cooperative societies, Maharashtra in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India:

- In the case of the Balance Sheet, of the state of affairs of the Bank as at 31st March, 2023.
- In the case of the Statement of profit and loss of the profit for the year ended on that date; and
- In the case of the Cash Flow Statement, of the cash flows for the year ended on that date.

E. Report on Other Legal and Regulatory Matters

The Balance Sheet and the Profit and Loss Account have been drawn up in Forms "A" and "B" respectively of the Third Schedule to the Banking Regulation Act, 1949 and provisions of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and the Maharashtra Co-operative Societies Rules 1961.

F. We report that:

a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory.

b) In our opinion, proper books of account as required by law have been kept by the Bank so far as it appears from our examination of those books and proper returns adequate for the purposes of our audit have been received from the branches/offices;

c) The transactions of the Bank, which have come to our notice, have been within the powers of the Bank.

d) The Balance Sheet and the Profit and Loss Account dealt with by this report, are in agreement with the books of account and the returns;
The accounting standards adopted by the Bank are consistent with those laid down by accounting principles generally accepted in India so far as applicable to Banks.

G. The details as required by the Rule 69(6) of Maharashtra Co-operative Societies Rules 1961 are given in the audit memorandum separately.

Or

as per the information and explanations given to us and based on our examination of the books of account and other records, we have not come across material instances in respect of the details mentioned in the Rule 69(6) of Maharashtra Co-Operative Societies Rules 1961.

H. We further report that for the year under audit, the Bank has been awarded "A" classification.

UDIN - 23604721BGYRRO4619
Signature
For Nahar Jain & Associates
Chartered Accountants
CA Chhajed Gaurav
(Partner)
Membership Number: 604721
Firm Registration Number: 132547W
Audit Panel Number: 19067
Date of Report: 26-06-2023

SCHEDULE A

Notes forming part of Balance sheet as at 31st March 2023 and Profit & Loss account for the year ended 31st March 2023.

I. SIGNIFICANT ACCOUNTING POLICIES:

1) Accounting Conventions (AS-1):

